# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

व्यवस्थापन परिषदेच्या (तातडीच्या) १७७ व्या ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

**गुरुवार, दि. ११ जुलै, २०२४ रोजी दुपारी ०४:०० वा.**

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७७ वी (तातडीची) बैठक **गुरुवार, दि. ११ जुलै, २०२४ रोजी दुपारी ०४:०० वा.** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | अनुपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | **जुन्नर, जि.पुणे येथे दि.१९ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसाठी वाहनाची व्यवस्था करणे, सर्व सन्माननीय सदस्यांच्या निवासाची व्यवस्था करणे, नाष्टा, जेवण व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने रु.२ लाख (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता मिळणेची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ, डेक्कन अभिमत विद्यापीठ, रुसा, जुन्नर नगरपरिषद, सह्याद्री गिरिभ्रमण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जुन्नर येथे पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय स्थापन करण्यात आले आहे. सदर वस्तुसंग्रहालयास भेट देऊन पाहणी करावी व दि.१९/०७/२०२४ रोजी त्या ठिकाणी व्यवस्थापन परिषदेची बैठक आयोजित करावी व दि.२०/०७/२०२४ रोजी परत यावे असे व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३/०६/२०२४ रोजीच्या बैठकीत ठरले होते. त्यानुसार मा.कुलगुरु महोदयांच्या मान्यतेने सदर बैठकीची सूचना दि. ०४/०७/२०२४ रोजी सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविण्यात आलेली आहे.<br>सदर बैठकीसाठी दि.१९ व २० जुलै, २०२४ रोजी सर्व सन्माननीय सदस्य यांना सोलापूर ते जुन्नर येथे घेऊन जाणे व परत येणे यासाठी ट्रॅव्हल गाडीची व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच जुन्नर येथे सर्वांची १ दिवसाच्या मुक्कामाची व्यवस्था व इतर अनुषंगीक बाबींची व्यवस्था करावी लागणार आहे. त्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणे आवश्यक आहे.<br>१. दि.१९/०७/२०२४ रोजी सोलापूर येथून जुन्नर येथे जाण्यासाठी ३० ते ३५ सीटर ट्रॅव्हल्सची व्यवस्था करण्यास, त्यासाठी अंदाजे रु.६०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>२. दि.१९/०७/२०२४ रोजी जुन्नर येथे मा.कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्य यांची निवासाची व्यवस्था करण्यास, व्यवस्थापन परिषेदची बैठक घेण्यासाठी हॉलची व्यवस्था करण्यास व त्यासाठी अंदाजे रु.६०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>३. दि.१९/०७/२०२४ ते दि.२०/०७/२०२४ या कालावधीत एकूण ३० ते ३५ व्यक्ती यांचा पाणी बॉटल, नाष्टा, जेवण इ. ची व्यवस्था करण्यासाठी रु.६०,०००/- आणि इतर किरकोळ खर्चासाठी अंदाजे रु.२०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>४. वरीलप्रमाणे अंदाजे रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता असावी.<br>५. सभा व निवडणुका विभागातील अधिकारी किंवा कर्मचारी यांचे नावे गरजेनुसार तसलमात घेण्यास मान्यता असावी.<br>६. वरीलप्रमाणे होणारा खर्च हा Meeting Expenses (other than TA/DA) या अंदाजपत्रकीय शिर्षकातून खर्ची टाकण्यास मान्यता असावी.<br>सबब, जुन्नर, जि. पुणे येथे दि.१९ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या अनुषंगाने वरील विविध बाबींसाठी रु.२ लाख (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) इतक्या खर्चास मान्यता मिळणेची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | **जुन्नर, जि.पुणे येथे दि.१९ जुलै, २०२४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसाठी वाहनाची व्यवस्था करणे, सर्व सन्माननीय सदस्यांच्या निवासाची व्यवस्था करणे, नाष्टा, जेवण व इतर अनुषंगिक बाबींच्या अनुषंगाने रु.२ लाख (अक्षरी रुपये दोन लाख फक्त) किंवा त्यापेक्षा जादा होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०२ ]</td><td>

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालीन बृहत आराखडा विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील, कलम १०७ (५) नुसार विद्यापीठ उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरुप अशी वार्षिक योजना दरवर्षी तयार करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सुरु करील आणि तो कालबध्द कार्यक्रम ज्या वर्षात उच्च शिक्षणाची नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरु करावयाची असतील त्या वर्षाच्या आधीचे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिध्द करतील अशी तरतूद आहे.

त्याअनुषंगाने मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा. नरेंद्र जाधव समितीने दिलेल्या मार्गदर्शकसूचनांच्या आधारे GIS platform चा वापर करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादरकरणे संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशिल</th><th>कालावधी</th></tr>
<tr><td>१)</td><td>सर्व अकृषी विद्यापीठांनी महाविद्यालयांचे स्थळबिंदू GIS संगणक प्रणालीमध्ये भरणे.</td><td>दि. २४ जून २०२४ ते दि. ०३ जुलै २०२४</td></tr>
<tr><td>२)</td><td>सर्व अकृषी विद्यापीठांनी संबंधित प्राधिकरणांची मान्यता घेऊन शासनाला आराखडा सादर करणे.</td><td>दि. २० जुलै २०२४ पर्यंत</td></tr>
</table>

त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दिनांक २६/०६/२०२४ रोजी जाहीर निवेदन देण्यात येवून दिनांक ०१/०७/२०२४ पर्यंत नवीन महाविद्यालय सुरु करणे संदर्भातील व नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणे संदर्भातील निवेदन मागविण्यात आली आहेत. दिनांक २६/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ परीसरातील शैक्षणिक संकूलाचेही प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर जाहीर निवेदनास व प्रस्तावास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करणेकामी छाननी समितीची बैठक दिनांक ०२/०७/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. डॉ. पी. एम. पवार, प्रभारी अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये संपन्न झाली.

सदर बैठकीत यापूर्वी उपसचिव, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक ०८/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०४/२०२४ रोजी संपन्न झालेल्या अभ्यास समितीच्या बैठकीत प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतर्गत सर्व अभ्यासक्रम व महाविद्यालयांच्या नोंदी अदयावत करण्यात आल्या आहेत त्याबाबतचा आढावा घेण्यात आला.

</td><td>संलग्नता विभाग</td></tr>
</table>

त्याप्रमाणेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या बृहत आराखडयातील प्रस्तावांच्या नामंजूरीमूळे नवीन महाविद्यालयाचे बिंदू ठिकाण रिक्त राहत असल्यास सदर बिंदू/ठिकाण शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या बृहत आराखडयात समाविष्ट करुन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २२/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार टेंभूर्णी, मंगळवेढा हे स्थळबिंदू सन २०२५-२६ च्या बृहत आराखडयात समाविष्ट करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०७ (५) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक सम्यक योजनेशी अनुरुप प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडातयार करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त झालेल्या निवदेनांची छाननी करुन तसेच दिनांक २२/०५/२०२४ व २४/०६/२०२४ रोजीच्या शासन पत्रांन्वये केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा तयार करणेबाबतचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी अधिष्ठाता मंडळास सादर करण्यात आला.

सदरचा अहवाल व अनुषांगिक प्राप्त निवेदने दिनांक ०६/०७/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केला असता त्यावर खालील प्रमाणे ठराव झाला आहे. "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७ (१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करणेकामी प्राप्त निवेदनांची छाननी करुन तयार करण्यात आलेला अल्पकालिन बृहत आराखडा सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आला."

सदरील अल्पकालीन बृहत आराखडयात व्यवस्थापन परिषदेने सर्वानुमते केलेली दुरुस्तीसह शिफारस विद्यापरिषदेच्या दिनांक ०९/०७/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आलेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत अध्यक्ष, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी विधी रात्र महाविद्यालय संदर्भात व चित्रकला पदवी महाविद्यालया संदर्भात निवेदन दिनांक ०९/०७/२०२४ रोजी सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे प्रभारी प्राचार्य, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते यांनी दिनांक ०९/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये एम.एस्सी. (रसायनशास्त्र), बी. ए. (Physical Education), बी. एस्सी. (Botany), बी. एस्सी. (Statistics), तर प्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयात बी. कॉम., एम.एस्सी. (सूक्ष्मजीवशास्त्र), एम. एस्सी. (रसायनशास्त्र) संदर्भात निवेदन दिलेले आहे. प्राचार्य, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक (विज्ञान) विद्यालय, वरवडे, ता. माढा यांनी दिनांक १०/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये बी.एस्सी विज्ञान शाखेसंदर्भात निवेदन दिले आहे. सदरील निवेदनांच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दिनांक ११/०७/२०२४ रोजी मा. प्र-कुलगुरु महोदय यांनी उपकुलसचिव,

| | | |
|---|---|---|
| | संलग्नता विभाग यांना भ्रमणध्वनीव्दारे उपरोक्त निवेदने आज दिनांक ११/०७/२०२४ रोजी आयोजित केलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये विषय सादर करणेबाबत तोंडी आदेश दिलेले आहेत. त्याअनुरोधाने अधिष्ठाता मंडळाच्या दिनांक ११/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता त्यावर अधिष्ठता मंडळाने खालील प्रमाणे ठराव केलेला आहे.<br>" महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला अल्पकालीन बृहत आराखडा पुढील कार्यवाहीसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली आहे."<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला अल्पकालीन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेल्या सुधारित अल्पकालीन बृहत आराखड्यास सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०३] | मा. शरद कोकाटे, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अकृषि विद्यापीठांच्या सन २०२५ ते २०२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थानी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचना विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | मा. शरद कोकाटे, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अकृषि विद्यापीठांच्या सन २०२५ ते २०२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थानी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचनानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद